महाराष्ट्र शासन

# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर


शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-२५६५१४५/१४६,

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in


क्रमांक :- तंशिस/विकाना/डीबीटी पोर्टल /२०२१-२२/ 1037 दिनांक:- 21 MAR 2022

प्रति,
प्राचार्य /संचालक,
शासकीय,अनुदानित, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय :- डीबीटी पोर्टलवरील योजनांच्या लाभासाठी विद्यार्थ्यांचे अर्ज तपासणी करण्याच्या कार्यवाहीबाबत.

संदर्भ :-१) उच्च् व तंत्रशिक्षण विभागाचा शा. निर्णय क्र. संकीर्ण-2017/प्र.क्र.332/तांशि- 4 दि.०७/१०/२०१७

२) मा. संचालक, तंशिसं, म.रा.मुंबई , यांचे पत्र. क्र.१८/तंशिसं /डीबीटी /विकाप /२०२२ /४८ / दि. १४ /०३ /२०२२

शैक्षणिक वर्ष **२०२१-२२** मधील महाडिबीटी पोर्टलवरील, तंत्रशिक्षण संचालनालयांमार्फत राबविण्यात येणा-या १) "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना २) "डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना" या दोन्ही योजनांचे अर्ज पुढील कार्यवाही करीता पाठवितांनी आपल्या संस्थेतील विद्यार्थी हा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे प्रवेशित आहे की नाही याची आपल्या स्तरावरून शहानिशा करूनच पात्र असलेल्या विद्यार्थ्याचे अर्ज मंजूरीस्तव या कार्यालयास पाठविण्याबाबत आपणास या कार्यालयामार्फत वारंवार कळविण्यात आलेले आहे. परंतु ब-याच संस्थेने या मुद्याची दखल न घेता संस्थास्तरावरील दोन्ही लॉगीन मधुन काटेकोरपणे तपासणी न करता शिष्यवृत्तीचे अर्ज मंजूरीस्तव पुढे पाठवित असल्याचे निदर्शनास आलेले आहे. तसेच आपल्या संस्थेतील प्रवेश रद्द झालेल्या विद्यार्थ्याचे शिष्यवृत्ती अर्ज सुद्या या कार्यालयाकडे मंजूरीकरीता पाठविण्यात आलेले आहे.

तरी याव्दारे आपणास सुचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता संस्थेने, अर्जात upload केलेले Allotment Letter ची तपासणी करतांना सदर विद्यार्थी हा केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेतून प्रवेशित झालेला आहे किंवा कसे याची शहानिशा, आपल्याकडे उपलब्ध असलेल्या **संस्थानिहाय मंजूर गुणवत्ता यादीतून करून पात्र असलेल्या विद्यार्थ्याचे अर्ज मंजूरीस्तव या कार्यालयास पाठविण्यात यावे.** जर विद्यार्थ्याने Against Cap / Institute level व्दारे प्रवेश घेतला असेल तसेच विद्यार्थ्याचे प्रवेश रद्द करण्यात आलेले असेल तर त्या विद्यार्थ्यांचे अर्ज थेट आपल्या लॉगीन मधून नामंजूर (Reject) करण्यात यावे.

**आपल्या लॉगीन मध्ये शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यासाठी तसेच मंजूरीस्तव पुढे पाठविण्याची दि. ३१/०३/२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. परंतु शिष्यवृत्ती योजनातंर्गत अनुदान खर्ची टाकण्याच्या दृष्टीकोनातून आपल्या लॉगीन ला प्रलंबित असलेले अर्ज दि. 25/03/2022 पर्यंत मंजुरीकरीता या कार्यालयास पाठविण्यात यावे. सदर अर्ज दि. 25/03/2022 पर्यंत मंजूरीकरीता या कार्यालयास प्राप्त न झाल्यास व त्यामुळे संबंधित विद्यार्थी संचालनालया मार्फत राबविण्यात येणा-या योजनेंपासून वंचित राहील्यास, याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्यांची / संस्थाप्रमुखाची राहील, याची नोंद घ्यावी.**

**(डॉ. मनोज भा. डायगव्हाने)**
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

प्रत:- मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय ,म.रा.मुंबई (कार्यासन क्र. १८) यांना माहितीकरिता मानार्थ सादर.